50/B

गट नं. ४५.
योगेश शिरापुरे.

100 Rs.

INDIA NON JUDICIAL

१०० रु. Rs 100

सत्यमेव जयते

भारत

एक सौ रूपये ONE HUNDRED RUPEES

नासिक ... २००७३ ... २९/७/९७ ... १००८

सौ. संजीवनी हरिभाऊ चौधरी, नासिक

हस्ते डी. आर. पगारे

Impounded under Sec. 39 of the B. S. Act. 1958

Collector of Stamp's Nasik

स्टॅम्प व्हेंडर

ARUN NARAYANRAO SAVANT NOTARY Govt of Maharashtra NASIK

NOTARIAL RUPEES FIVE 5 भारत

CANCELLED

॥ श्री ॥

-: कधीही रद्द न होणारे जनरल मुखत्यार पत्र :-

कधीही रद्द न होणारे जनरल मुखात्यार पत्र आज दिनांक २३ माहे जुलै इसवी सन १९९७ रोज ~~सोमवार~~ बुधवार ते दिवशी नाशिक मुक्कामी..

| | |
|---|---|
| श्री. योगेश बाळकृष्ण शिरापुरे,<br>उ.व. २७, धंदा- व्यापार व शेती,<br>रा. बी. २१२, मेघदूत शॉपिंग सेंटर,<br>सी. बी. एस. नासिक | लिहून घेणार |

यांसी...

| | |
|---|---|
| १. सौ. संजीवणी हरिभाऊ चौधरी,<br>उ.व. ३०, धंदा- शेती,<br>२. सौ. चारुशिला रमेश शेलार,<br>उ.व. ३१, धंदा- शेती,<br>रा. ३२६४, बागवान पुरा, ता. जि. नासिक | लिहून देणार |

..२..

कारणे जनरल मुखत्यार पत्र लिहून देतो ऐसा जे की..

१. मिळकतीचे वर्णन :-

तुकडी जिल्हा, नाशिक, पोट तुकडी तालुका नाशिक पैकी मौजे-आडगांव या गांवचे शिवारातील व सध्या नासिक महानगरपालीका हद्दीतील परंतू नासिक नागरी जमीन कमाल मर्यादा क्षेत्राबहेरील नियोजित नाशिक महानगरपालिका विकास आराखडयांत निवासी क्षेत्रात दर्शविलेली मिळकत.

अ] गट नंबर ४५ यांसी क्षेत्र ०० हे १७ आर, पैकी पुर्व बाजूचे... हे. ००.१५ आर यांसी एकुण आकार रुपये ०.३३ पैसे यांसी चतु:सिमा :-

| | | |
|---|---|---|
| पुर्वेस | : | गट नं. ४४ |
| दक्षिणेस | : | गट नं. ४६ [illegible] |
| पश्चिमेस | : | गट नं. ४५ मधील उर्वरित मिळकत. |
| उत्तरेस | : | गट नं. ४३ [illegible] |

२. वर कलम १ यात नमुद केलेल्या मिळकती या आम्ही तुम्हांस ~~[illegible]~~ सदर करारनाम्याचे अनुषांगाने तुम्हांस येथून पुढे सदर मिळकती संबंधाने जी जी कामे करावयाची आहेत ती ती सर्व कामे करणेसाठी वेळोवेळी आमची समक्ष हजर रहाण्याची गरज लागणार आहे. आमचे वैयक्तिक सोयी, सवडीचे कारणाने आम्ही तुम्हांस वेळचे वेळी उपलब्ध न होणेची बरीच शक्यता असून तुम्हांस धुळे येथून वेळोवेळी सदर मिळकती संबंधी कामे करण्यासाठी यावे लागत असल्याने तुम्ही सदर मिळकतीचे कामासाठी नाशिक येथे आले असता आम्ही तुम्हांस उपलब्ध न झाल्यास, तुमची फार मोठी गैरसोय होऊन, सदर कामकाज लांबत जाण्याची शक्यता आहे. नियोजित व्यवहाराची तुमचे व आमचे दरम्यानेचे देवाणघेवाणीची

C.R. Shelar.

S.H. Chaudhari

..३..

ARUN NARAYANRAO SAVANT
NOTARY Govt. of Maharashtra
NASIK

महत्वपुर्ण टप्पा पार पडलेला असल्याने तुमचे पुढील कामाची खोटी होणे उचित होणार नाही. तसेच तुमचे कामाची खोटी झाल्यास आपले उभयतांचे जबर नुकसान होईल. सबब वरील कारणांचा विचार करुन, आम्ही तुम्हांस नमुद केल्यानुसार कलम १ मध्ये नमुद केलेल्या मिळकती संबंधाने खाली नमुद केलेली कामे करण्यासाठी व सामान्य पणे सदर मिळकतीचे मालक म्हणून आम्ही जी सर्व प्रकारची कामे केली असती ती सर्व प्रकारची कामे करण्यासाठी आम्ही तुम्हांस अधिकार देत आहोत.

१. वर कलम १ मध्ये नमुद केलेल्या मिळकतीचे सरकारी मोजणी साठी संबंधीत भुमापन कार्यालयाकडे व अगर त्यांचे गरजेनुसार शासनाकडे अर्ज करुन संबंधीत मिळकतीच्या सरकारी मोजणीची फी भरणे, त्यांच्या मोजणी संबंधीच्या नोटीसा स्विकारणे, मोजणीचे कामी हजर राहून मे. मोजणी अमंलदार यांनी मोजणीचे काम करीत असतांना त्यांचे कामात त्यास कायदेशिरप्रकारे सहकार्य करुन चतु:सिमा मान्य करणे अथवा त्या संबंधाने न्याय मार्गाने कारवाई करुन त्याबाबत कायद्याचा अंतिम निर्णय मिळविणे, नकलांसाठी अर्ज करणे, त्या ताब्यांत घेणे, त्याबाबत मोबदला देणे, भरलेल्या अनामत रक्कमांचे संपुर्ण अगर अंशत: परतावे घेणे, त्याबाबत पावत्या देणे व तदनुषंगिक सर्व प्रकारची कामे करणे.

RAO SAVANT
RY of
tra
K

२. वर कलम १ मध्ये नमुद केलेली मिळकतीचे स्वतंत्रारित्या व अगर एकत्रिकरण करुन अथवा एकमेकांशी सुसंगत लेआउट बनविणे, त्याचे मंजुरीसाठी नकाशे व अर्ज दाखल करणे, त्याचे मंजुरीसाठी आवश्यक त्या अनामत रकमा भरणे, त्याचे तपासणी फीसहीत संबंधीत योजना अधिकाऱ्यांकडून मागणीनुसार सर्व प्रकारच्या कर, फी अथवा तत्सम मागणी केलेल्या सर्व रकमा भरणे, त्यांच्या पावत्या घेणे, भरलेल्या सर्व प्रकारचे रकमांचे संपुर्ण अगर अंशत: शिल्लक रकमांचे परतावे घेणे, ते मिळालेबद्दल पावत्या देणे,

ARUN NARAYANRAO S... NT
NOTARY
Govt. of Maharashtra
...SIK

अंतिम लेआऊट मंजुरीसाठी आवश्यक त्या सर्व रक्कम भरणे, करारमदार करून घेणे, देणे व अगर तदनुषांगाने सर्व प्रकारच्या पुर्तता करून घेणे, देणे वगैरे सर्व कामे करणे.

३. वर कलम १ मध्ये नमुद केलेल्या मिळकतीस ना.ज.क.म.अधिनियम १९७६ च्या तरतूदी लागू नाहीत. असे आम्ही तुम्हांस सांगितलेले आहे. परंतू तसे आढळून आल्यास सदर मिळकती संबंधाने आवश्यक ते प्रपत्र दाखल करून घेऊन, सिलींगचे कायद्यानुसार, प्रपत्र अंतिम करून घेऊन अतिरिक्त क्षेत्र आढळून आलेस सदर अतिरिक्त क्षेत्राचे ना.ज.क.म.कायद्यानुसार तुमचे दृष्टीने अधिकाधिक लाभदायक जी योजना तयार करणे शक्य असेल त्या तळेगांव दाभाडे नमुन्या सहीत सर्व प्रकारच्या योजना मंजुर करून घेणे, त्याबाबत घोषणापत्रे, हमीपत्रे, आमचे नांवे आमचेसाठी दाखल करणे.

४. वर कलम १ मध्ये नमुद केलेल्या मिळकतीत तुम्हांस करावयाची कामे करण्यासाठी तुम्ही व अगर आमचे तर्फेचे कंत्राटदार, कारागिर, कामगार, मजूर व अगर अन्य कोणतेही इसमांस अगर त्यांचे समुहास जाणेयेणेसाठी व तेथे प्रत्यक्ष नियोजित लेआऊट नुसार चतु:सिमांचे अनुषांगाने प्लॉट पाडणे, त्यांच्या खुणा खाडणे, रस्ते बांधणे, पाईप लाईन्स टाकणे, वीज वाहक तारांचे खांब उभारणे, आवश्यकतेनुसार विंधन विहीरी अगर परंपरागत पध्दतीच्या विहीरी खोंदणे, बांधणे, त्याचे पाणी पुरवठयाच्या पाईप लाईन्स जमिनीवरून अगर जमिनी अंतर्गत टाकणे, संबंधित योजना मंजुरी करणारे अधिका-यांकडून त्यांचे तपासणी परिक्षण करून घेणे, त्याबाबत कोणताही तंटा निर्माण झाल्यास त्याचे निराकरण करणे, व त्यास मंजुरी मिळविणे.

५. वर कलम १ मध्ये नमुद केलेल्या उपलब्ध मिळकतीसंबंधाने विकसनांचा प्रकल्प तयार करणे, त्यानुसार त्याचे संपुर्ण प्रकल्पाची व



ARUN NARAYA...
NO...
Go...
Maha...
NA...

ARUN NARAYANRAO SAVANT
NOTARY
Govt. of
Maharashtra
NASIK



अगर अंशत: भागाची सदर विकसन प्रक्रिया चालू असतांना अथवा पुर्ण करुन त्यातील बांधकामयोग्य भुखंडाची अथवा भुखंड व बांधकामाची बांधीव इमल्यांची अगर त्याचे अंशत: भागाची व्यवस्था इच्छुक खरेदीदारांशी विक्री, खरेदी करणेसाठी बोलणी करणे, त्याबाबत सोदा निश्चित करणे, त्याचे विसार पावत्या, साठेखत विकसन करार, कबजे पावत्या, खरेदीखाते भाडेपट्टे, गहाणखाते, करुन देणे, करुन घेणे, त्यावर सहया करणे, आमचे वतीने आम्ही केलेल्या सहया मे. दुय्यम निबंधाकांकडे सदर मिळकती संबंधाने कोणताही दस्तऐवज नोंदणीस हजर झाला असता कबूल करणे, नाकारणे, दस्तऐवज नोंदणीस हजर करणे, नोंदून घेणे वगैरे कामे करणे.

६. वर कलम १ ... यात नमुद केलेल्या मिळकतीचे कोणतेही महसुली, दिवाणी व अगर फौजदारी न्यायालयात अथवा न्यायधिकरणापुढे अथवा तत्सम कोणतेही लष्करी व अगर मुलगी शासकीय वा निमशासकीय अधिका-यांपुढे अथवा संस्थेपुढे आमचे वतीने समक्ष हजर राहून अर्ज, याचिका, दावे, अपीले, रिव्हिजन्स, रिव्हयू, संबंधीची प्रकरणे दाखल करणे, व अगर त्याचा प्रतिवाद करणे , त्याबाबतचे अर्ज, पिटीशन, दावे, अपिल, मेमो, रिव्हिजन मेमो, रिव्हयू मेमो तयार करणे,त्यावर सहया करणे व अगर अशा प्रकरणी उलटपक्षी त्याचप पुर्वपक्ष, उत्तरपक्ष करणेसाठी कैफियती , जबाब,प्रतिजबाब, प्रतिज्ञापत्रे, उलट प्रतिज्ञापत्रे तयार करुन त्यावर सहया करणे, सदर प्रकरणी तडजोड करणे, झालेल्या निकालावर वरीष्ठ न्यायालयात म्हणजे मुळ न्यायालयीन वा अर्ध न्यायालयीन स्वरुपाचे कामकाज चाललेल्या कार्यालयातील निकालापासून सर्वोच्च न्यायालयापोवतो

...O SAVANT
...RY
...of
...itra
...SIK

ARUN NARAYANRAO SAVANT NOTARY Govt. of Maharashtra NASIK

वाद,प्रतिवाद,पुर्व पक्ष, उत्तरपक्ष करणे त्यात समझोते झाल्यास समझोत्यानुसार मोबदल्याच्या रक्कमा देणे, घेणे,त्याबाबत पावत्या देणे, अनामत रक्कमा भरणे, त्या काढूण नेणे वगैरे न्यायालयाशी संबंधीत कामे करण्यासाठी ज्या ज्या स्वरुपाचे अधिकार आवश्यक असतील त्या त्या सर्व प्रकारच्या अधिकारांचा वापर करणे.

६. सदर मिळकती संबंधाने कोणत्याही स्वरुपाची कामे करण्यासाठी वकील, ॲडव्होकेट, बॅरिस्टर ,सॉलिसिटर्स त्यांचे सहाय्यक क्लार्क, टायपिस्ट व तत्सम अन्य कार्यालयीन कामकाजाचा कर्मचारी वर्ग नेमणे, त्यांचे वकीलपत्र, नेमणुक पत्र त्यास देणे, त्यावर आमचे वतीने सहया करणे, त्यांचे मानधन, सेवाशुल्क, मेहनताना, बक्षिसी, पगार व तदुनुषांगिक सर्व प्रकारचे खर्चासाठी लागणा-या रक्कमा देणे, त्या परत घेणे, त्यांच्या नेमणुका रद्द करणे, पुर्ननेमणुका करणे, त्याबाबत नुकसान भरपाई देणे, व तदनुषांगिक सर्व कामे करणे.

७. वर कलम १ मध्ये नमुद केलेल्या यातील मिळकती संबंधाने विकसनार्थ आवश्यक असलेल्या सर्व प्रकारचे तज्ञ, सल्लागार, कुशल, अर्धकुशल कर्मचारी, सेवकवृंद यांच्या नेमणुका करणे त्यांचे मानधन सेवाशुल्क, पगार, मेहनताना जादा कामाचे भत्ते, कामगार कायद्या नुसारच्या अपघाताच्या नुकसान भरपाईच्या रक्मा भरणे, त्याबाबत तडजोडी करणे व तत्सम सर्व प्रकारची कामे करणे.

८. केंद्र सरकार, राज्य सरकार, स्थानिक महानगरपालिका, जिल्हा, परिषद तसेच या सर्वांची निरनिराळया प्रकारची उपांगे असलेल्या खात्यातील कनिष्ठांपासून वरिष्ठ अधिका-यांपावेतो व अगर वरील शासनाचे अंगीकृत व्यवसाय असलेल्या वीज मंडळ, प्रदुषण नियंत्रण, महामंडळ, व तत्सम सर्व प्रकारचे वैधानिक महामंडळे, कंपन्या, बँका

ARUN NARAYANRAO SAVANT
NOTARY
Govt. of
Maharashtra
NASIK

यांचेशी सर्व प्रकारचे परवानग्यांसाठी अर्ज करणे, त्याबाबत समक्ष हजर राहून जाबजबाब देणे, प्रतिज्ञापत्रे, दाखल करणे, हमी पत्रे भरून देणे, त्याबाबत आवश्यक त्या कर,उपकर, सेवाशुल्के मोबदले, नजराणा, नुकसान भरपाई, फरक बाकी अथवा अन्य कोणत्याही प्रकारच्या आर्थिक व वैधानिक व्यवहारासंबंधी लागणारी सर्व प्रकारची कामे करणे, निरनिराळे खात्यातील आवश्यक त्या परवानग्या,दाखले, ना हरकत पत्रे, नोटीसा,देणे,घेणे व तदनुषांगिक सर्व कामे करणे.

९. सदर मिळकतीचे प्रचलित विकास आराखडयानुसारचे विभागीकरण [झोनींग] आवश्यकतेनसार वापरणे, ते बदलून घेणे,त्यावरील अतिरिक्त क्षेत्राबाबतचे व्यवहार करणे, बांधकामाचे मोबदले रोख अगर वस्तूरूपाने देणे, बांधीव क्षेत्र स्वरूपात देणे, सनदा मिळविणे व तदनुषांगिक सर्व प्रकारचे कामे करून जबाबदा-या पार पाडणे.

१०. सदर मिळकतीचे अनुषांगाने आवश्यकत ते जमाखर्च तयार करणे, त्यांच्या रूजवाती घेणे, त्यावरून आयकर, विक्रीकर,विकास कर व तत्सम करांची जबाबदारी पार पाडणे, ते ठिकाणीच वळते करून घेऊन त्या त्या कार्यालयात त्या त्या व्यक्तींसाठी सदर कर्जे रकमा कापून घेतलेबद्दल दाखले देणे, त्यारकमांचा भरणा करणे व तदनुषांगाने सर्व प्रकारची कामे करणे.

११. सदर मिळकतीचे मालकी कबजे वहिवाटीचे हक्कासंबंधाने कोणत्याही प्रकारचे वादविवाद, तंटे, बखेडे निर्माण झाल्यास त्याचा पुर्व पक्ष, उत्तर पक्ष करणे, त्याबाबत जडजोडी करणे, त्याचे मोबदले देणे, मोबदले घेणे, क्षेत्राची बदलाबदल करून घेणे, देणे, त्यातील फरकाच्या रकमा घेणे, देणे वगैरे तत्सम व तदनुषांगिक कामे करणे.

..८..

ARUN NARAYANRAO ... NOTARY Govt. of Maharashtra NASIK

१२. या लेखात नमुद करणे आवश्यक होते परंतू जाणता अजाणता ज्या विशिष्ट अधिकाराचा विशिष्ठ स्वरूपाची कामे करणे-साठी उल्लेख करणे जरूर होते, परंतू तो तसा केला गेलेला नाही असे दैववशात आढळून आल्यास अशा प्रकारची कामे आम्ही समक्ष हजर राहून ज्या प्रकारे केली असती त्या प्रकारची सर्व प्रकारचे कामे करणे, त्याचे हक्क व जबाबदाऱ्या लाभ घेणे, लाभ देणे, वगैरे तत्सम सर्व प्रकारचे अधिकार सदर मुखात्यारास दिलेले असल्याने सदरचे मुखत्यार पत्र हे कुलमुखत्यारपत्र असल्याचे आम्ही स्पष्टपणे नमुद करीत आहोत.

१३. आम्ही या लेखाने असेही जाहीर करीत आहोत की, या लेखात नमुद केलेल्या सर्व प्रकारचे सदर मुखात्यारास प्रदान केलेले हक्क व अधिकाराचे संबंधाने जी कथने केलेली आहेत, त्यातील कथनांचे इंग्रजी भाषांतर योग्य प्रकारे केल्यास त्याचे संबंधीत कायद्यानुसार त्याचे अभावी जनरल क्लॉझेस अ‍ॅक्ट प्रात नमुद केलेल्या व अशा प्रकारे कोणतेही कायद्यात संबंधीत शब्दांची जी व्याख्या असेल त्या व्याख्येनुसार व त्याचे अभावी मुलत: मराठी इंग्रजी शब्द कोषानुसार व त्याचे अभावी सर्वमान्य इंग्रजी शब्दकोषानुसार ज्या व्याख्या, अर्थ सर्वसामान्यपणे व्यवहारात ज्या अर्थाने वापरले जातात, त्या अर्थाने घ्यावयाचे असून कारणावशात एकाहुन अधिक परस्पर विरूध्द प्रकारचे अथवा भिन्न भिन्न प्रकारचे व्याख्या व अगर अर्थ निर्माण होत असल्यास सदर मुखात्यार पत्रा-न्वये सदर मुखात्यारास दिलेल्या अधिकाराचा अर्थ मुखात्यारांचे लाभात लिहून दिलेल्या विकसन करारानुसार सदर विकसनदाराचे जो अधिक लाभाचा असेल, तो अर्थ व्याख्या अग्रक्रमाने स्विकारार्ह राहील.

..९..

ARUN NARAYANRAO SAVANT NOTARY Govt. of Maharashtra NASIK



१४. उपरोक्त मिळकत आम्ही तुम्हांस कायम फरोक्त खारेदी देण्याचे मान्य व कबुल करून तुमचे लाभांत आम्ही अलाहिदा साठेखात लिहून दिलेले आहे. परंतू खारेदीखातासाठी आम्हांस बरिचशी कामे करावी लागणार आहेत. आमचे शती व्यवसायामुळे सदरची कामे एकत्रित पणे करणे, जमणार नाही. सबब आम्ही तुम्हांस आमचे जनरल मुखात्यार नेमले असून प्रस्तुतचा दस्त तुमचे लाभात लिहून दिलेला आहे.

१५. उपरोक्त मिळकत किंवा तिचा कोणताही भाग, प्लॉट/प्लॉटस् विक्री करणे, त्यासाठी तिऱ्हाईत इसमांबरोबर बोलणी करणे, इच्छुक ग्राहकांबरोबर किंमत निश्चित करणे, वाटाघाटी करणे, त्यांचेकडून किंमती पोटी रक्कमा स्विकारणे, त्यांचे लाभांत साठेखात खारेदीखात लिहून देणे, आवश्यकता भासले त्या प्रमाणे मे. दुय्यम निबंधक साहेब, यांचे कार्यालयात सदर दस्तावर सहया करून ते नोंदवून देणे, तेथील रजिस्टरवर सहया करणे, आम्ही समक्ष हजर राहून केले असता अशी सर्व कामे करणे.

१६. उपरोक्त मिळकतीचे संरक्षण करतांना कोणी हिल्ला हरकत केल्यास त्याचे विरूध्द योग्य त्या दिवाणी, फौजदारी किंवा मुलकी न्यायालयात दावे करणे, तक्रारी करणे आमचे विरूध्द कोणी कारवाई केल्यास त्याचे विरूध्द कैफियत देणे, बचाव करणे, शपथेवर जबाब देणे, ई. वकील बॅरिस्टर नेमणे, त्यांची फी देणे ई. खालचे कोर्टापासून अखेरचे कोर्टापर्यंत तुम्ही आमचे वतीने व आमचे साठी कामे पहाणे, व मिळकतीचे संरक्षण करणे.

१७. उपरोक्त मिळकती संबंधी प्रस्तुत दस्तावरून तुम्हांस प्राप्त असलेल्या हक्क व अधिकारान्वये तुम्ही अन्य त्रायस्थ इसमांस अगर नविन मुखात्यारास नेमू शकता त्यास आमचे संमती आहे

ARUN NARAYANRAO SAVANT
NOTARY
Govt. of Maharashtra
NASIK

व राहील. अशा मुखत्यारांनी तुमचे बरोबर केलेल्या एकत्रित व संयुक्त कामे तसेच प्रथमरित्या केलेली कामे व त्यांचे परिणाम व दस्तऐवज आमचेवर बंधनकारक असतील व राहीतील.

१८. उपरोक्त मिळकती संबंधाने तुम्ही जी जी कामे कराल व जे जे दस्तऐवज लिहून द्याल ते सर्व आम्ही समक्ष हजर राहून दिलेली आहेत. असे समजण्यात येईल. हे मुखत्यारपत्र आम्ही कधीही रद्द करणार नाही.

१९. महाराष्ट्र जमिन महसूल कायदा कलम ४४ अन्वये उपरोक्त मिळकत बिनशेतीकडे वर्ग करून घेण्यासाठी योग्य व त्या फार्ममध्ये मे. कलेक्टर साहेब, नाशिक यांचेकडे अर्ज करणे, करारपत्र, प्रपत्र तयार करून त्यावर आमचे वतीने व आमचेसाठी सह्या करणे, सर्व कागदपत्रांची पुर्तता करणे, ले-आऊट सादर करणे, रूपांतरीत कर भरणे, व सदर मिळकत बिनशेती कडे वर्ग करून घेणे, बिनशेती झाल्यावर मे. गांवकामगार तलाठी साहेब, नासिक यांना बिनशेती वापर सुरु झालेबद्दल लेखी कळविणे व त्याची पोच घेणे.

ARUN NARAYAN
NOT.
Gov
Mahar.
NAS

२०. उपरोक्त मिळकतीवर ले-आऊट आर्किटेक्टचे मदतीने तयार करून नाशिक महानगरपालिकेच्या नगररचना विभागाकडून टेन्टेटिव्हरित्या मंजूर करून घेणे, त्यानुसार तयार झालेले रस्ते, व ओपन स्पेस ताब्यात देणे, व तसे नाशिक महानगरपालिकेच्या ताब्यात देण्यासंबंधी करारनामा लिहून देणे, त्यानंतर मिळकतीवर नियमानुसार स्ट्रीट लाईट पाईपलाईन वृक्षारोपन, ओपनस्पेसला तारकंपाऊंड इ. करणे, नियमाप्रमाणे सर्व पुर्तता झाल्यावर त्याचे अधिका-यांमार्फत तपासणी करून अंतिम ले-आऊट मंजूर करून घेणे.

सदर कामे करतांना तुम्हांला वेळोवेळी जी तदनुषांगिक कामे

..११.

ARUN NARAYANRAO SAVANT
NOTARY
Govt. of
Maharashtra
NASIK

करावी लागती. फी भरावी लागेल ती ती तुम्ही करावीत. लेआऊटवर सही करावी, तदनुषंगिक अर्ज, प्रपत्रे, करारनामे, इत्यादींवर सह्या करणे, ते सादर करणे, आवश्यकता भासल्यास मंजुर लेआऊट मध्ये दुरूस्ती करावयाची असल्यास व "रिव्हाईज्ड ले-आऊट" टाकणे, तो मंजूर करून घेणे, त्याप्रमाणे मिळकतीचे प्लॉटचे डिमार्केशन करणे, रस्ते, तयार करणे स्ट्रीट लाईट, ओपनस्पेस वेगळे करणे, इत्यादी सर्व कामे तयार करणे, तुम्ही करावीत. आम्ही सदर प्रसंगी हजर राहून केली असता अशी सर्व कामे तुम्ही करावीत. या व्यतिरिक्त अन्य कामे देखील तुम्ही करू शकता त्यास आमची संमती आहे व राहील. तुम्ही केलेली कामे व करून दिलेले दस्तऐवज आम्ही स्वत: करून दिलेली आहे असे समजण्यात येतील व ती आमचेवर व आमचे वालीवारसांवर बंधनकारक राहतील.

येणे प्रमाणे सदरचे मुखात्यार पत्र करून देणारे आम्ही लिहून देणार इसम असे बिनशर्त विनाअट निर्विकल्पणे व निर्विवादपणे असे जाहीर करतो की, सदर मुखात्याराने या मुखात्यार पत्राचे आधारे वर कलम यात नमुद केलेल्या मिळकती संबंधाने जी जी कामे केली असतील ती ती सर्व कामे, कृत्ये केल्याने व अगर न केल्याने त्याचे जे काही परिणाम हक्क व जबाबदाऱ्या निर्माण होतात व अगर होतील अथवा होणे शक्य आहे त्या सर्व हक्क व जबाबदाऱ्यांची त्या त्या कामांची कृतीची अथवा कृती न करणेची सदर मुखात्याराची कृती, हस्तक्षेप, परिणाम आम्ही स्वत: व केल्याप्रमाणे आमचेवर नि:संदीग्धपणे बंधनकारक राहतील. सदर मुखात्याराने केलेल्या सर्व प्रकारच्या कृतीचे अगर कृती न करणेचे

..१२..

NOTARY Govt. of Maharashtra ARUN NARAYANRAO SAVANT NASIK

आम्ही समर्थन करणेची व अगर पश्चात न करणेची आमचेवर जबाबदारी असून त्यायोगे कोणीही त्रायस्थाने कोणत्याही प्रकारचे नुकसान झाल्याचे अगर होणार असल्याचे आढळून आल्यास त्याबाबत सदर त्रायस्थांस आमची निर्विवाद स्वरूपाची हमी आहे व राहील.

येणे प्रमाणे सदरचे कधीही रद्द न होणारे मुखत्यारपत्र राजीखुषीने, अक्कल हुषारीने, समजून, उमजून परिणामांची जाणीव ठेवून कोणतीही नशापाणी अंमल न करता, आमचे सांगणेबरहूकूम लिहिलेली खात्री करून घेऊन त्याचे साक्षीदारांचे उपस्थितीत जाहीर वाचन करून आज दिनांक २१ माहे जुलै इसवी सन १९९७ रोजी नासिक येथे करून दिले आहे.

हे नाशिक तारीख मजकूर.

१. S. H. Chaudhari

[सौ. संजीवणी हरिभाऊ चौधरी]

२. C. R. Shelar.

[सौ. चारुशिला रमेश शेलार]

लिहून देणार.

सदरचे व्यक्तींना मी ओळखतो व ते तेच आहेत.

BEFORE ME

A. N. SAVANT
ADVOCATE & NOTARY
NOTARY MAHARASHTRA STATE

B/July/50/1997
Noted and Registered at Serial Number

**CERTIFICATE**

CERTIFIED that Shri V. B. Shirapure ......................... has credited an amount of Rs. 24201/- ............ on account of deficit Stamp duty and Rs. 34501/-........ only on account of penalty into the Govt. Treasury Nashik...... on 25.3.03..... Challan No. 98

The document is therefore certified as properly stamped under section 41 of the Bombay Stamp Act. 1958 Sub to the Provi. U/S 53-A of B.S.Act. 1958

Nashik.
27.3.03

Collector of Stamps,
Nashik